दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com
● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● बुधवार दि.१५ ऑक्टोबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक ५७ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये
● Beed (Mahmar) Daily Marathi ● Wednesday 15 Oct 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 57 ● Pages 4 ● Rate 4 Rs

### महाविकास आघाडीत कुणाचा कुणाशी पायपोस नाही

**मुंबई**–एकनाथ शिंदे येथे पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले, विरोधी पक्षांचे शिष्टमंडळ आपल्या तक्रारींचा पाढा वाचण्यासाठी निवडणूक आयोगाकडे आले आहे. ही महाविकास आघाडी नाही तर महाकन्फ्यूज आघाडी आहे. त्यांच्यात एवढे कन्फ्यूजन आहे की, कोण काय बोलते हे काहीच समजत नाही. कुणाचा कुणाशी पायपोस नाही. त्यामुळे हे कन्फ्यूज लोक एकत्र आलेत.आज राज्य सरकार शेतकऱ्यांसाठी ज्या पद्धतीने काम करत आहे ते पाहून तथा सरकारने शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेले आर्थिक पॅकेज पाहून विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. विरोधकांनी महायुतीचा लोकसभा व विधानसभा निवडणुकीतील विजय पाहिला. आता आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही महायुतीने केलेल्या कामाची पोचपावती जनता दिल्याशिवाय राहणार नाही.

# कोरडेवाडी आंदोलन तापले; आत्मदहनाच्या प्रयत्नाने प्रशासन हादरले

## केजमध्ये कोरडेवाडीच्या ग्रामस्थांचा साडेचार तास रास्ता रोको

## दोघांचा आत्मदहनाचा प्रयत्न; पाच बसवर दगडफेक : पाच प्रवाशी जखमी

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

कोरडेवाडी येथील साठवण तलावासाठी पाणी उपलब्धता प्रमाणपत्र देण्यात यावे,शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजाराची मदत व संपूर्ण कर्जमाफी करावी,ज्ञानराधा बँकेच्या ठेवीदारांना ठेवीची रक्कम परत देण्यात यावा या मागण्यांसाठी आक्रमक झालेल्या ग्रामस्थांनी मंगळवारी (दि. १४) दुपारी १२ वाजता मोर्चा काढून शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात तब्बल साडेचार तास रास्ता रोको आंदोलन केले. या आंदोलनात बाळराजे आवरेंनी पेट्रोल अंगावर ओतून तर स्वप्नील वरपेंनी विषारी औषध प्राशन करीत आत्मदहनाचा प्रयत्न केला. तर अज्ञातांनी बसवर दगडफेक केल्याने पाच बसचे काचा फुटून नुकसान झाले. तर बसमधील चालक, वाहकांसह पाच प्रवाशी जखमी झाले.छत्रपती संभाजीराजे शौर्य प्रतिष्ठानच्या राजश्री उमरे यांनी मागील बारा दिवसांपासून या मागण्यासाठी उपोषण सुरू केले असताना शासनाकडून मागण्यासंदर्भात दखल घेतली नसल्यावरून ८ ऑक्टोबर रोजी संतप्त आंदोलकांनी शासकीय विश्रामगृह येथून बैलगाडी मोर्चा काढून तहसील कार्यालयासमोर पेट्रोल टाकून बैलगाडी पेटविली. तर



काही आंदोलनकांनी अंगावर पेट्रोल ओतून आत्मदहणाचा प्रयत्न केला होता. त्यानंतर ११ ऑक्टोबर रोजी आंदोलक व गावकऱ्यांनी टोकवाडी रस्त्यावरील तलावात उतरून जलसमाधी आंदोलन केले. या दोन आंदोलनानंतर ही शासनाकडून मागण्यांची दखल घेतली जात नसल्याने गावकरी आक्रमक बनले होते.मंगळवारी सकाळी ११.३० वाजता आक्रमक झालेल्या गावकऱ्यांनी मुलाबाळांसह केजला मोर्चा काढला. दुपारी १२.३० वाजता धारूर चौकातून मोर्चाला सुरुवात करीत पाणी आमच्या हक्काचं, देत कसं नाही, घेतल्याशिवाय राहत नाही, शेतकऱ्यांना ५० हजार रुपये अनुदान व कर्जमाफी मिळाली पाहिजे अशा घोषणा देत अहिल्यानगर - अहमदपूर या राष्ट्रीय महामार्गावर छत्रपती शिवाजी महाराज चौकात दुपारी पावणे एक वाजता रास्ता रोको आंदोलनास सुरुवात केली. आंदोलनकर्त्यांनी आपल्या भाषणातून खासदार, आमदारांसह सरकारवर टीकेची झोड उठवून तब्बल साडेचार तास रास्ता रोको आंदोलन केले. आंदोलनात बाळराजे आवरेंनी पेट्रोल अंगावर ओतून तर स्वप्नील वरपेंनी विषारी औषध प्राशन करीत आत्मदहनाचा प्रयत्न केला.आंदोलन सुरू असताना अज्ञातांनी रस्त्यावर उभ्या असलेल्या लातूर - पाटोदा (एम. एच. १४ एमएच १५५९), अहमदपूर - चाळीसगाव (एम. एच. १४ एमएच ६५२२), उदगीर - गंगापूर (एम. एच. १४ एमएच ८९३८), गंगाखेड - आळंदी (एम. एच. १४ बीटी ३९६४), (एम. एच. २० बीएल २१०८) या बसच्या समोरील काचावर दगडफेक करण्यात आल्याने बसचे नुकसान झाले आहे. तर बसमधील चालक, वाहकांसह पाच प्रवाशी जखमी झाले.त्यामुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. काही बस या बसस्थानकात उभ्या केल्याने बसस्थानक बसने गच्च भरले होते.दरम्यान, शहरात आलेली वाहने रास्ता रोकोमुळे रस्त्यावर थांबून राहिल्याने दूरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. तर अंबाजोगाई, बीड, पुणे, कळंब, धारूर रस्त्यावरील वाहतूक चार तास ठप्प राहिल्याने प्रवाशी नागरिक - महिला अडकून पडले होते. तर प्रवाशांची उपासमार झाली.

### जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा;आंदोलक तहसील मध्ये ठाण मांडून

**उपविभागीय अधिकारी दीपक वजाळे यांनी आंदोलकांना रास्ता रोको मागे घ्यायला लावून तहसील कार्यालयातून जिल्हाधिकाऱ्यांशी बोलणे करून दिले. जिल्हाधिकाऱ्यांनी गुरुवारी राज्यांच्या सचिवांशी चर्चा घडवून देण्याचे आश्वासन दिले. मात्र आताच तलावासाठी पाणी उपलब्धता प्रमाणपत्र द्यावे, असा आग्रह धरीत तहसील कार्यालयात आंदोलक ठाण मांडून होते.**

## असलोद गावात शॉर्ट सर्किटमुळे दोन एकर ऊस जळून खाक,अग्निशमन गाडीला तब्बल तीन तास उशीर

दैनिक वादळ वार्ता
**वडाळी । लाला चव्हाण**

शहादा तालुक्यातील असलोद गावात सोमवारी रात्री घडलेल्या शॉर्ट सर्किटच्या घटनेत शेतकऱ्याचा तब्बल दोन एकर ऊस जळून खाक झाला.. ही घटना रात्री सुमारे नऊ वाजताच्या सुमारास घडली.. शेतकरी साहेबराव गुलाबराव शिंदे रात्री जेवण करत असताना अचानक ऊस जळत असल्याची बातमी मिळताच ते ताटावरून उठून शेतात धावले.घटनेनंतर रात्री साडेनऊच्या सुमारास अग्निशमन दलाला संपर्क साधण्यात आला.. परंतु फक्त पंधरा मिनिटांच्या अंतरावर असलेली गाडी तब्बल तीन तासांनी घटनास्थळी दाखल झाली.. तोपर्यंत आग आटोक्याबाहेर गेली होती.. यामुळे लाखो रुपयांचे नुकसान झाले असा आरोप शेतकरीनि केला आहे.याहून संतापजनक बाब म्हणजे घटनास्थळी पोहोचलेली अग्निशमन




गाडी केवळ अर्धीच पाण्याने भरलेली होती. त्यामुळे आग विझविण्याचे प्रयत्न अपुरे ठरले.. या निष्काळजीपणामुळे शेतकऱ्यांमध्ये आणि ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.गावातील सुमारे तीनशे ते चारशे नागरिकांनी एकत्र येऊन स्वतःच्या प्रयत्नांनी आग विझविण्याचा प्रयत्न केला.. अखेर ही आग नियंत्रणात आणली गेली, मात्र ऊसाचे पूर्ण नुकसान झाले.घटनास्थळी महावितरण विभागाचे कर्मचारी व महसूल विभागाचे तलाठ्यांमार्फत नुकसानीचा पंचनामा करण्यात आला असून संबंधित शेतकऱ्याला आता शासनाच्या भरपाईची प्रतीक्षा आहे.. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, अग्निशमन दल वेळेवर आलं असतं, तर आमचा ऊस वाचला असता, असा आक्रोश त्यांनी व्यक्त केला..भोगळ्या कारभाराचा फटका शेतकऱ्यांना - ऊसाच्या जळालेल्या शेतातून उठतोय निष्काळजीपणाचा धूर!

## पालकमंत्री अजित पवारांना आ.क्षीरसागर यांचा कडून अतिवृष्टीच्या नुकसानीचा अहवाल सादर

### मतदार संघातील विविध मागण्यांचे दिले पत्र

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

मागील काही दिवसांपूर्वी बीड मतदार संघात झालेल्या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा पालकमंत्री मा.अजित पवार यांना आ.संदीप क्षीरसागरांनी भेट घेऊन अहवाल सादर केला.आ.संदीप क्षीरसागर यांनी दि.१४ (मंगळवार) रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांची भेट घेत अतिवृष्टीच्या नुकसानीचा अहवाल सादर करत विविध मागण्यांचे पत्र दिले. यामध्ये भूस्खलनाच्या धोक्यामुळे कपिलधारवाडी येथे माळीण गावासारखी दुर्घटना होण्याची शक्यता असून या गावाचे पुनर्वसन करण्याची मागणी केली. तसेच



अतिवृष्टीमुळे सर्वाधिक नुकसान झालेल्या आणि पुढील काळात देखील संभाव्य धोका असलेल्या हिंगणी खुर्द गावाचे स्थलांतर करण्याची मागणी देखील आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.याव्यतिरिक्त बीड मतदार संघातील रस्ते व पूल वाहून गेल्यामुळे नागरिकांना ये जा करण्यास मोठी अडचण येत आहे. अनेक गावांचे संपर्क तुटल्याने हे रस्ते व पूल तातडीने दुरुस्त करण्यात यावे तसेच काही ठिकाणी नवीन रस्ते आणि पूल करण्यात यावे. यासह सार्वजनिक मालमत्तेचे झालेल्या नुकसानीचा अहवाल अजित पवारांना सुपूर्द करून तातडीने आवश्यक कार्यवाही करण्याची विनंती केली.

## प्रशांत भैय्या गाडे यांच्या कडून पूरग्रस्ताना जीवनावश्यक वस्तूची मदत,पुरग्रस्त नागरिकांना दिलासा

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

मागील काही महिन्यात मराठवाडयामध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने भयंकर पूर परिस्थिती निर्माण झाली आहे.अनेक गावातील घरात पाणी शिरले होते तर अनेकांच्या शेतातील पिके भुईसपाट झाली.त्यामुळे मराठवाड्यातील जन जीवन विस्कळित झाले होते.त्यामुळे आपण आपल्या समाजाचे काही देणं लागतो,आपल्या घासातला घास आपण इतरांना दिला पाहिजे या भावनेतून मुंबई चे युवा उद्योजक प्रशांत भैय्या गाडे यांनी मराठवाड्या तील पूरग्रस्त भागातील नागरिकांना मदतीचा हात देत ब्लँकेट,चादरी,अन्न धान्य,तेल,बिस्किटे, फरसाण,चटणी,व अन्य गृहउपयोगी वस्तू,औषधे खाद्य पदार्थ वाटप केली.



या वेळी शिवप्रसाद ठोंबरे, अभिषेक भिसे,राहुल ठोंबरे,बप्पा भिसे,राम काळे,प्रदीप ठोंबरे,पोपट लांडगे,राजाभाऊ इटकर, शेळके अण्णा,विक्रम चोन्दे,आकाश भैय्या फरके,शशिकांत काळे, वैभव काळे,विलास शिनगारे,राहुल इंगळे, विशाल यादव,नितीन काळे सर्व मित्र परिवार उपस्थित होता.दरम्यान या मदतीमुळे पुरग्रस्त नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

## विद्यार्थी व युवकांच्या प्रश्नांवर युवक संघटनेची जोरदार निदर्शने

दैनिक वादळ वार्ता
**परळी । प्रतिनिधी**

मराठवाड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेती आणि शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. या विदारक परिस्थितीत डेमोक्रॅटीक युथ फेडरेशन ऑफ इंडिया (ऊ्धत्रख) युवक संघटनेच्या परळी तालुका कमिटीच्या वतीने सिरसाळा चौकामध्ये राज्य शासनाच्या धोरणांविरोधात मंगळवार दि १४ रोजी जोरदार निदर्शने करण्यात आली. अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा फटका शेतकरी आणि विद्यार्थी या दोघांनाही बसला असून, शासनाने त्वरित ओला दुष्काळ जाहीर करून दिलासा द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.मागील महिन्यात महाराष्ट्रात अनेक ठिकाणी अतिवृष्टी झाली, विशेषतः मराठवाड्यात पावसाचे प्रमाण अधिक होते. शेतीमधील पीक आणि माती वाहून गेल्यामुळे शेतकऱ्यांच्या हातात आलेले सगळे पीक निसटून गेले आहे. या परिस्थितीत शेतकऱ्यांना जगणे मुश्किल झाले आहे. त्यामुळे शासनाने ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफी करण्याची मागणी ऊ्धत्रख ने केली आहे. या संकटाचा मोठा फटका विद्यार्थ्यांनाही व युवकांनाही बसला आहे.



अतिवृष्टी झालेल्या भागातील विद्यार्थ्यांच्या पालकांना शिक्षण शुल्क, निवास आणि भोजन खर्च भागविणे अडचणीचे झाले आहे. विद्यार्थ्यांवरील हा शैक्षणिक खर्चाचा बोजा कमी करण्यासाठी अतिवृष्टी झालेल्या भागातील विद्यार्थ्यांचे संपूर्ण शैक्षणिक शुल्क माफ करण्यात यावे, अतिवृष्टीत पडझड झालेल्या शाळांची त्वरित दुरुस्ती करण्यात यावी, युवकांच्या रोजगारासाठी सर्व रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरु करावी आणि कंत्राटी पद्धती बंद करावी, एमपीएससी सह इतर सर्व स्पर्धा परीक्षांची फी माफ करावी, शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ करावे.या मागण्या घेऊन करण्यात आलेल्या निदर्शनांमध्ये ऊ्धत्रख युवक संघटनेचे बीड जिल्हा सचिव विशाल देशमुख, तसेच विजय घुगे, सिद्राम सोळंके, मनोज देशमुख, मुंजाभाऊ नवघरे, इस्माईल शेख, मदन राठोड, अशोक जाधव, मदन वाघमारे, बिबीशन भिसे, प्रकाश कावळे, महादेव शेरकर, प्रवीण देशमुख ,यांसह शेकडो कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदवला. शासनाने या मागण्या त्वरित पूर्ण न केल्यास भविष्यात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी ऊ्धत्रख च्या वतीने देण्यात आला.

## बीडमध्ये ९ नोव्हेंबरला शिक्षकांची राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या शाळा प्रवेश दिन (७ नोव्हेंबर) निमित्त नालंदा फाऊंडेशन, बीड यांच्या वतीने शिक्षकांची राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा येत्या ९ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९ वाजता तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, आदर्श नगर, डीपी रोड, बीड येथे पार पडणार आहे.या राज्यस्तरीय स्पर्धेत प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, पदवी, पदव्युत्तर तसेच विद्यापीठीय स्तरावरील शिक्षकांना सहभागी होता येणार असून १) महात्मा फुले यांचे रचनात्मक कार्य ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे घटनात्मक कार्य २) मूल्य शिक्षण संस्कारात शिक्षकांची भूमिका तसेच ३) संविधान साक्षरतेत शिक्षकांची भूमिका हे विषय निश्चित करण्यात आले आहेत.


**डॉ.बाबासाहेब आंबेडकर शाळा प्रवेश दिनानिमित्त नालंदा फाऊंडेशन, बीड यांच्या वतीने स्पर्धेचे आयोजन**




स्पर्धेसाठी प्रवेश फी ५०० रुपये निश्चित करण्यात आली असून, १ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत नोंदणी करता येईल. विशेष म्हणजे, सर्व स्पर्धकांसाठी एक वेळ मोफत भोजन व्यवस्था आयोजकांकडून करण्यात आली आहे.वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांना प्रथम पारितोषिक रुपये २५ हजार, द्वितीय पारितोषिक रुपये १५ हजार व तृतीय पारितोषिक रुपये १० हजार रोख रक्कम, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे.या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या शिक्षकांनी नोंदणी व अधिक माहितीसाठी ७९९०७६०१५१ किंवा ९५६१८१७४७४ या क्रमांकावर संपर्क साधावा आणि शिक्षकांनी जास्तीत जास्त सहभाग नोंदवावा असे आवाहन या उपक्रमाचे प्रमुख संयोजक प्रा.प्रदीप रोडे यांनी केले आहे.

संपादकीय

# सहकारातील घोटाळे



सहकारी संस्थांमधील घोटाळे ही एक गंभीर समस्या असून, यात अनेक प्रकारच्या गैरव्यवहारांचा समावेश आहे, जसे की बळकावलेला निधी, बेकायदेशीर कर्ज वाटप आणि शासकीय जमीन घोटाळे. अलीकडील काही प्रमुख उदाहरणे म्हणजे यशवंत सहकारी बँकेतील सुमारे ११२ कोटींचा घोटाळा आणि मराठवाड्यातील विविध पतसंस्थांमधील हजारो कोटींचा घोटाळा.सहकारासाठी प्रसिद्ध असणाऱ्या पश्चिम महाराष्ट्रात सध्या बँकेतील घोटाळे उघड होण्याचे दिवस आहेत. सांगलीत भाजपचे माजी मंत्री सदाभाऊ खोत आणि आमदार गोपीचंद पडळकर यांच्या तक्रारीवरून जयंत पाटील यांच्या नेतृत्वाखालील सर्वपक्षीय जिल्हा मध्यवर्ती बँकेतील संचालक मंडळाला ५५९ जागांवर नोकर भरती करण्यास स्थगिती दिली आहे. त्यापूर्वीच्या प्रकरणांची चौकशी सुरू आहे ती वेगळीच. कोल्हापुरातील वारणेच्या प्रकरणात चौकशी सुरू आहे. एकूणच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावर दक्षिण महाराष्ट्रात सहकारातील घोटाळे उघड होऊ लागले आहेत. पण, यातून खरेच काही उघडकीस येणार की अंडरस्टँडिंग होणार याकडे दक्षिण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. जयंत पाटील आणि गोपीचंद पडळकर हा वाद सध्या राज्यभर चर्चेत आहे. त्यात सांगलीत झालेल्या संस्कृती मेळाव्यात राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या काही अतिउत्साही लोकांनी सदाभाऊ खोत यांच्या मातोश्रींबाबत अपशब्द काढले शिवाय मुख्यमंत्र्यांच्या परिवाराबद्दलही वाईट वक्तव्य केली. त्यानंतर भाजपने संताप व्यक्त केला. मिळालेल्या माहितीनुसार जयंत पाटील यांच्याकडून याबद्दल भाजपच्या वरिष्ठ पातळीवर सारवासारव करण्यात आली. नंतर गोपीचंद पडळकर यांनी आपण यापुढे जयंत पाटील यांच्याविषयी बोलणार नाही असे जाहीर केले. त्यातून संधी साधत जयंत पाटील यांनी योग्य वेळी आपण सर्वांना ठोकून काढणार असे जाहीर केले. त्यामुळे पुन्हा कलगीतुरा रंगला आहे. त्यातच अजित पवार गटाचे असलेले राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी जयंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला नोकर भरती करण्यासाठी परवानगी दिली. त्यामुळे संतापलेल्या सदाभाऊ खोत यांनी सहकार मंत्र्यांच्या विरोधात टोकाची भूमिका घेऊन त्यांची मुख्यमंत्र्यांकडे तक्रार केली.आधीची नोकर भरती वादग्रस्त असताना आणि त्याच्यावर आरोपांसह इतर व्यवहारांची चौकशी सुरू असताना सहकारमंत्र्यांनीही यात वाटा उचलला आहे असा खोत यांनी घरचा आहेर दिला. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी मग खुलासे करत ही परवानगी राज्याच्या सहकार आयुक्तांनी दिली आहे. आपण नाही असे सांगून अंग काढण्याचा प्रयत्न केला. वास्तविक या प्रकरणातील सगळेच राजकारण उघड आहे. पूर्वाश्रमीचे काँग्रेस आणि राष्ट्रवादीचे नेते भाजप आणि अजित पवारांच्या गटात सुद्धा सामील असल्याने एकमेकाला सांभाळून घेण्याच्या राजकारणात ते माहीर आहेत. त्याचा सर्वाधिक परिणाम दक्षिण महाराष्ट्रावर होतो. या प्रकरणी खोत यांच्या तक्रारीनंतर मुख्यमंत्र्यांनी लक्ष घातल्याने नोकर भरतीला स्थगिती देण्यात आली आहे. आता ही नोकर भरती टीसीएस किंवा शासकीय यंत्रणेमार्फत तटस्थपणे होईल. परिणामी एकेका जागेसाठी होणारी लाखो रुपयांची बोली लागणार नाही. अनेकांनी या जागी आपले लोक घेतले जावेत म्हणून संचालकांकडून जागा आरक्षित केल्याचे आणि त्यासाठी काही आर्थिक व्यवहारांची चर्चाही झाल्याचे सांगितले जात आहे. अशा स्थितीत भाजप सरकारने दिलेला हा दणका सत्ताधारी पक्षातील मंडळींना सुद्धा खट्टू करून गेला आहे. त्यामुळे भविष्यात स्वतःला विस्थापित म्हणणाऱ्या खोत आणि पडळकर यांना प्रस्थापित म्हणून हे नेते स्वीकारतील का? आणि त्यांच्या पंगतीत बसल्यानंतर या नेत्यांची तक्रार बंद होईल का? याबद्दल आता चर्चा सुरू झाली आहे. ती काही असली तरी सांगलीच्या सहकाराला आणि जयंत पाटलांचे नेतृत्वाला यामुळे जबरदस्त तडाखा बसला आहे. आता जर हे नेते तडजोडीला आले तर दक्षिण महाराष्ट्राचे चित्र बदललेले दिसून येईल.कोल्हापूर जिल्ह्यात सहकारातील घोटाळे तुलनेने कमी समोर येत असले तरी, सातारा-सांगलीतील घडामोडींचा परिणाम इथेही दिसतो आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत गेल्या वर्षी (२०२४) काही बोगस कर्ज वितरणाच्या तक्रारी नोंदवल्या गेल्या होत्या, ज्यात स्थानिक नेत्यांचे नातेवाईक सामील असल्याचा संशय होता. विशेषतः वारणा सहकारी साखर कारखान्याशी जोडलेल्या बँकांमध्ये थकबाकी वसुलीतील अनियमिततेच्या आरोपांनी वातावरण ढवळून निघाले आहे. एका अहवालानुसार, कोल्हापूर जिल्ह्यातील नागरी सहकारी बँक असोसिएशनमध्ये २०२४-२५ मध्ये लेखापरीक्षणादरम्यान ५० कोटी रुपयांहून अधिकच्या बोगस कर्जांची बाब समोर आली, ज्यात संचालक मंडळाने बनावट दस्तऐवज तयार केल्याचा आरोप आहे. यामध्ये स्थानिक भाजप आणि राष्ट्रवादी नेत्यांचे कार्यकर्ते सामील असल्याने राजकीय वाद पेटला. जिल्हा परिषद शिक्षक सहकारी बँकेतही नियमबाह्य भरतीच्या प्रकरणात सोलापूरशी जोडलेल्या संस्थांवर कारवाई झाली असून, कोल्हापूरमध्येही अशीच तक्रार दाखल झाल्याचीमाहिती आहे. मात्र, भरती प्रक्रिया सुरू असल्याने (जसे की कोल्हापूर जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशनची २० लिपिक भरती), चौकशीला स्थगिती मिळाली आहे. दक्षिण महाराष्ट्रात सहकार हा शेतकऱ्यांना पाठबळ असावा, पण आज तो राजकीय हत्यार बनला आहे. शेतकरी आणि ठेवीदारांच्या हितासाठी सहकार विभागाने तातडीने सुधारणा करणे गरजेचे आहे. अन्यथा, ही क्रेझ संपूर्ण महाराष्ट्रात पसरेल आणि सहकाराची प्रतिमा धुळीला मिळेल.

# क्षत्रिय माळी नवयुवक गणेश मंडळाचा सामाजिक वसा
# सातपुड्यातील अतिदुर्गम भागातील गरजू बांधवांना कपडे वाटप

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

सामाजिक भान आणि बांधिलकी जपत श्री क्षत्रिय माळी नवयुवक गणेश मंडळाने एक अत्यंत स्तुत्य आणि माणुसकीचा उपक्रम राबवला आहे. मंडळाने सातपुडा पर्वतरांगांमधील अतिदुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी व गरजू नागरिकांपर्यंत मदतीचा हात पोहोचवत कपडे वाटप मोहीम यशस्वीरित्या पूर्ण केली.समाजातील दुर्लक्षित घटकांपर्यंत पोहोचणे आणि त्यांना आधार देणे हे सामाजिक संस्थेचे खरे कर्तव्य आहे. हे ओळखून मंडळाच्या सदस्यांनी ही विशेष मोहीम आखली. सणासुदीच्या पार्श्वभूमीवर गरजू कुटुंबांना आनंदाचा वाटा मिळावा या उद्देशाने त्यांना नवीन आणि स्वच्छ वापरण्यायोग्य कपडे वाटण्यात आले.




या उपक्रमात मंडळाच्या सदस्यांनी आणि स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्तपणे कपड्यांचे संकलन केले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, संकलित केलेले हे कपडे केवळ एका ठिकाणी वाटण्यात आले नाहीत, तर मंडळाच्या स्वयंसेवकांनी दुर्गम आणि डोंगराळ भागातील गावांमध्ये स्वतःहून जाऊन गरजू कुटुंबांपर्यंत ही मदत पोहोचवली. अतिदुर्गम भागात पोहोचण्यासाठी अनेक अडथळ्यांवर मात करत स्वयंसेवकांनी ही माणुसकीची सेवा केली.या उपक्रमाबद्दल बोलताना मंडळाचे अध्यक्ष राकेश मगरे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. ते म्हणाले की, समाजसेवा हेच आमच्या मंडळाचे मुख्य उद्दिष्ट आहे. आम्ही वर्षभर सांस्कृतिक, धार्मिक कार्यक्रमांसोबतच सामाजिक उपक्रमांनाही तेवढेच महत्त्व देतो. हा कपडे वाटप उपक्रम म्हणजे गरजूंसाठी आमच्या मनातील ओढ व्यक्त करण्याचा एक छोटासा प्रयत्न आहे.मंडळाच्या 'समाजसेवा हीच खरी सेवा' या ध्येयाला प्रतिसाद देत अनेक दानशूर मंडळींनी आणि स्थानिक नागरिकांनी कपड्यांचे दान करून या कार्यात सक्रिय सहभाग घेतला.श्री क्षत्रिय माळी नवयुवक गणेश मंडळाने राबवलेला हा उपक्रम निश्चितच अनुकरणीय आहे. अशा उपक्रमांमुळे सामाजिक सलोखा वाढीस लागतो आणि गरजू बांधवांना मायेचा व आधाराचा हात मिळतो, यात शंका नाही. ही मदत नुसती वस्त्रांची नव्हे, तर माणुसकीची होती, हे या उपक्रमाने सिद्ध केले.

# श्री तुळजा भवानी मंदिर देवस्थानच्या वतीने पूरग्रस्त शेतकऱ्यांना ४०० मदत किटचे वाटप

## देवस्थानच्या विश्वस्त मंडळाचे मन:पूर्वक आभार-अनिलदादा जगताप

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या भीषण पूरस्थितीत शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या अडचणीत सापडले आहेत. या कठीण प्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या नियोजनाखाली श्री तुळजाभवानी मंदिर देवस्थान, नाशिक यांच्या वतीने पूरग्रस्तांना दिलासा देण्यात आला. काल दि. १३ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११. ०० वाजता सिंदफणा नदीकाठी वसलेल्या तांदळवाडी व आहेर चिंचोली या गावांमध्ये देवस्थानाकडून पूरग्रस्त नागरिकांना ४०० किराणा मदत किटचे वाटप करण्यात असून मदतकार्य देवस्थानाचे विश्वस्त मंडळ अध्यक्ष माजी आमदार ॲड. शिवाजी सहाणे, सचिव सुभाष पाटोळे, सदस्य राजेंद्र गायकवाड, रवींद्र गायकवाड, प्रमोद लोणकर, बाळासाहेब चव्हाण, दिलीप कदम, अरुण गायकवाड व महेश पाटोळे यांच्या उपस्थितीमध्ये पार पडले. पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतात आणि डोळ्यात पाणी असताना आम्ही फुल नाही फुलाची पाकळी देण्याचा प्रयत्न करत आहोत. दिवाळी अगोदर सरकारकडून मदत जाहीर होणारच आहे. मात्र आज श्री तुळजाभवानी मंदिर देवस्थान, नाशिक वतीने आपल्या घरात मदत किट पोहचवल्या जात आहेत, याबद्दल देवस्थानच्या सर्व विश्वस्तांचे मी आभार मानतो असे शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी आपल्या भाषणात सांगितले. श्री तुळजाभवानी मंदिर देवस्थान यांच्या या मदतकार्यामुळे पूरग्रस्त नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. संकट काळात समाजासाठी पुढे येणाऱ्या या उपक्रमाचे ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करत कौतुक केले.याप्रसंगी जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, शिवसेना उपजिल्हाप्रमुख अमोल जाधव, उपजिल्हाप्रमुख अजय जाधव, तालुका प्रमुख संतोष जाधव, उपशहरप्रमुख हनुमानप्रसाद पांडे तसेच आकाश जगताप, लक्ष्मीकांत दोडके, प्रतिक कांबळे आणि योगेश सारुक उपस्थित होते.




### निदान दोन दिवसाची का होईना चूल पेटावी-ॲड.शिवाजी सहाणे

**श्री तुळजाभवानी मंदिर देवस्थान यांच्या वतीने पूरग्रस्त शेतकऱ्यांना छोटीशी मदत म्हणून निदान दोन दिवसाची का होईना चूल पेटावी या भावनेने किराणा मदत किटचे वाटप करत आहोत. शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी गावोगावी गरजवंत शेतकऱ्यांची यादी बनवून सर्वांना कसा लाभ मिळवून देता येईल यासाठी पुढाकार घेतला. त्यांच्या मदतीमुळेच आम्ही आज आपणा पर्यंत पोहचू शकलो, असे मत माजी आमदार तथा श्री तुळजाभवानी मंदिर देवस्थानचे अध्यक्ष ॲड. शिवाजी सहाणे यांनी व्यक्त केले.**

# ग्लोबल वॉर्मिंगनंतर हिमयुग



सध्या जागतिक हवामानबदलाची चर्चा सुरू आहे, मात्र यानंतर हिमयुग अवतरण्याची शक्यता आहे. अलीकडेच कॅलिफोर्निया विद्यापीठाच्या संशोधकांनी पृथ्वीच्या नैसर्गिक कार्बनचक्रातील एक मोठी त्रुटी शोधून काढली. ही त्रुटी पृथ्वीच्या तापमानात असामान्य बदल कसे होऊ शकतात आणि दीर्घकालीन जागतिक तापमानवाढीनंतर हिमयुगासारखे अत्यंत थंडीचे युग कसे येऊ शकते, हे स्पष्ट करण्यास मदत करते.पृथ्वीचे तापमान प्रामुख्याने खडकांच्या नैसर्गिक क्षरणामुळे नियंत्रित होते. या प्रक्रियेत पाऊस वातावरणातून कार्बन डायऑक्साइड शोषून घेतो. पावसामुळे तो खडकात मिसळतो. खडक हळूहळू विरघळतात आणि कार्बन आणि कॅल्शियमच्या रूपात समुद्रात पोहोचतात. समुद्रात हे कार्बन साठे एकत्र होऊन शंख, कोरल आणि चुनखडीचे खडक तयार होतात. त्यामुळे समुद्राच्या तळावरील कार्बन दीर्घकाळ स्थिर राहतो. शास्त्रज्ञांनी या कार्बनचक्राचा एक नवीन पैलू शोधला आहे. तो पृथ्वीला अत्यंत थंड वातावरणाकडे ढकलू शकतो. पृथ्वी गरम होताना खडकांची झीज वेगाने होते. त्यामुळे जास्त कार्बन डायऑक्साइड शोषले जाते आणि वातावरणातून ते बाहेर पडते. यामुळे पृथ्वी थंड होते. संशोधकांनी म्हटले आहे, की पृथ्वी गरम होताना खडक कार्बन जलद शोषून घेतात आणि पुन्हा थंड करतात. जुने भूगर्भीय पुरावे दर्शवतात, की पृथ्वीचे सुरुवातीचे हिमयुग इतके तीव्र होते की संपूर्ण ग्रह बर्फाने झाकलेले होते. संशोधकांना आढळून आले आहे, की समुद्रातला कार्बनसंचयदेखील या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावतो.वातावरणातील कार्बन डायऑक्साइड वाढत असताना आणि पृथ्वी गरम होत असताना फॉस्फरससारखे अधिक पोषक घटक समुद्रात जातात. हे पोषक घटक प्लॅक्टनच्या वाढीस चालना देतात. प्लॅक्टन सूर्यप्रकाशाच्या मदतीने कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात. प्लॅक्टन मरतात, तेव्हा त्यांचे शरीर कार्बनसह समुद्राच्या तळाशी पडते आणि कार्बन कायमचा साठवला जातो; पण उष्ण, पोषकतत्त्वांनी समृद्ध महासागरांमध्ये ऑक्सिजनची पातळी कमी होते. ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे समुद्राच्या तळाशी जमा होण्याऐवजी फॉस्फरसचा समुद्रात पुनर्वापर केला जातो. अधिक पोषक तत्त्वे, अधिक प्लॅक्टन, अधिक कार्बन संचय, अधिक थंड होणे ही प्रक्रिया हळूहळू संतुलित होण्याऐवजी पृथ्वीला अत्यंत थंड होण्यास कारणीभूत ठरू शकते. या प्रक्रियेचे स्पष्टीकरण देताना संशोधक सांगतात की, तुम्ही आपल्या घरात एअर कंडिशनर (एसी) चालू करून तापमान २५ अंश सेल्सिअसवर ठेवू इच्छिता. बाहेरील तापमान वाढल्यास एसी अधिक थंडी निर्माण करतो. काही प्रकरणांमध्ये ही थंडी जास्त असू शकते.त्याचप्रमाणे पृथ्वीचा थर्मोस्टॅट कधी कधी जास्त थंडी निर्माण करतो. संशोधनात असेही आढळून आले आहे, की प्राचीन काळात वातावरणातील ऑक्सिजनची पातळी खूपच कमी होती. त्यामुळे हे थर्मोस्टॅट आणखी अनियमित आणि अस्थिर बनले. म्हणूनच मागील हिमयुग इतके तीव्र होते. आज उच्च ऑक्सिजन पातळी बदलाचा परिणाम कमकुवत करेल; परंतु तरीही पुढील हिमयुगाच्या प्रारंभास काही प्रमाणात विलंब होऊ शकतो. याचा अर्थ असा आहे का, की मानववंशीय जागतिक तापमानवाढीनंतर पृथ्वी पुढील हिमयुगात प्रवेश करू शकतात? याबाबत संशोधकांचे म्हणणे हो असे आहे; परंतु ते लवकर होणार नाही. त्यांचे मॉडेल असे सूचित करते, की जास्तीत जास्त थंडी असा परिणाम नक्कीच निर्माण करेल; परंतु सध्याचे हवामान संकट कमी करण्यासाठी हे पुरेसे नाही. संशोधन पत्रात म्हटले आहे, की पुढील हिमयुग पन्नास हजार वर्षांमध्ये सुरू होईल की दोन लाख वर्षांमध्ये हा खरा प्रश्न आहे. पृथ्वीचे नैसर्गिक थर्मोस्टॅट या आयुष्यात आपल्याला मदत करू शकत नाही.या संशोधनातून स्पष्ट होते, की पृथ्वीवरील नैसर्गिक प्रक्रिया गुंतागुंतीच्या आहेत. जागतिक तापमानवाढीच्या सध्याच्या युगात आपल्या क्रियाकलापांवर आणि कार्बन उत्सर्जनावर नियंत्रण ठेवणे आपल्यासाठी अत्यावश्यक आहे. नैसर्गिक प्रणाली अखेरीस ग्रह थंड करतील; परंतु ही प्रक्रिया खूप मंद आहे आणि त्याचे परिणाम आपल्या आयुष्यात जाणवणार नाही. म्हणूनच सतत प्रयत्न आणि जागरूकता ही आजची सर्वात तातडीची गरज आहे

शास्त्रज्ञांचा विश्वास आहे, की आपल्याला अजूनही आपल्या उत्सर्जनावर नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता आहे. हे खरे आहे, की उष्ण झालेली पृथ्वी पुन्हा कधी तरी थंड होईल; परंतु ती इतकी मंद असेल, की या पिढीला त्याचा काहीही उपयोग होणार नाही. म्हणून आपल्याला आजच कृती करण्याची गरज आहे, कार्बन उत्सर्जन कमी करणे, पर्यावरणपूरक वातावरण निर्माण करणे आणि शाश्वत ऊर्जास्रोतांकडे वाटचाल करणे. जागतिक तापमानवाढ उलटवल्याने थेट हिमयुग सुरू होण्याची शक्यता नाही. त्याऐवजी, पृथ्वीचे नैसर्गिक चक्र आणि हरितगृह परिणाम पुढील हिमयुग सुरू होण्यास विलंब करू शकतात, जे पुढील दहा हजार ते एक लाख वर्षांमध्ये अपेक्षित आहे. काही सिद्धांत सूचित करतात, की जागतिक तापमानवाढ समुद्राच्या प्रवाहांना, विशेषतः गल्फ स्ट्रीमला विस्कळीत करून हिमयुग सुरू करू शकते. त्यामुळे युरोपमध्ये नाट्यमय थंडी पडते.कार्बन डायऑक्साइडचे उत्सर्जन ताबडतोब थांबले, तरी सध्याच्या जागतिक तापमानवाढीचे आणि महासागरातील बदलांचे परिणाम पुढील हजार वर्षांमध्ये अपरिवर्तनीय असतील. आपल्या आयुष्यात हिमयुग सुरू होणे अशक्य होईल. १९७० दशकाच्या सुरुवातीला सलग अनेक वर्षी थंडी जास्त होती, तेव्हा काही शास्त्रज्ञांनी तापमानातील घट ही पृथ्वी एका नवीन हिमयुगात प्रवेश करत असल्याचे लक्षण आहे, असा अर्थ लावला; परंतु त्या दशकाच्या अखेरीस भाकिते उलटली आणि तज्ज्ञ वाढत्या तापमानाबद्दल काळजी करू लागले. तेव्हापासून सरकारे आणि पर्यावरणीय गट वातावरणातील हरितगृह वायू आणि जागतिक तापमानवाढ कमी करण्यासाठी सार्वजनिक ऊर्जेच्या वापरात नियम आणि बदल करण्यासाठी दबाव आणत आहेत. आपण आपल्या ऊर्जावापराच्या सवयी बदलण्याचा प्रयत्न करताना काही शास्त्रज्ञ प्रश्न विचारत आहेत, की जागतिक तापमानवाढ खरोखरच काही उद्देश पूर्ण करत आहे का? ही वाढती उष्णता आपल्याला दुसऱ्या हिमयुगात प्रवेश करण्यापासून रोखत आहे का आणि आपण ही प्रक्रिया उलट केली, तर पुन्हा एकदा बर्फाने झाकले जाऊ का? अतिथंडी आणि उष्णता पृथ्वीच्या इतिहासात नवी नाही. एक अब्ज वर्षांपासून पृथ्वीने उष्णता आणि थंडीच्या कालावधीत तापमानात आलटून पालटून मंद चढ-उतार अनुभवले आहे. समुद्राचे प्रवाह, सूर्याभोवती पृथ्वीच्या कक्षेत बदल आणि वातावरणीय रचना यासह अनेक घटक याला जबाबदार आहेत. यापैकी काही कालखंड इतरांपेक्षा जास्त तीव्र होते.हिमयुग नावाच्या तीव्र शीतलहरीही येऊन गेल्या आहेत. त्या दरम्यान विशाल हिमनद्यांनी पृथ्वीचा बराचसा भाग व्यापला होता. हिमयुगांदरम्यान पृथ्वी सामान्यतः सापेक्ष उष्णतेच्या काळात प्रवेश करते, त्याला आंतरहिमयुग म्हणतात, जे आपण गेल्या बारा हजार वर्षांपूर्वीच्या हिमयुगाच्या समाप्तीपासून अनुभवत आहोत. आता दिसते की आपण तापमानवाढीच्या ट्रेंडमध्ये आहोत. अनेक शास्त्रज्ञांच्या मते तो पृथ्वीच्या वातावरणात उष्णता अडकवणाऱ्या हरितगृह वायूंचा परिणाम आहे. एका विचारसरणीच्या मते तापमानवाढ करणारा ग्रह म्हणजे असा ग्रह, जो हिमयुगात संपण्याची शक्यता कमी असते. पृथ्वी नेहमीच उष्ण आणि थंड चक्रातून जात असते.शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे, की पुढील दहा हजार ते एक लाख वर्षांमध्ये कधी तरी आपल्याला आणखी एका मोठ्या थंडीचा सामना करावा लागेल. असे झाले तर युरोप आणि उत्तर अमेरिकेसह जगाचा बराचसा भाग बर्फाच्या जाड चादरीने झाकला जाईल. काही संशोधकांच्या मते हरितगृह वायूच्या परिणामामुळे पृथ्वीच्या वातावरणात अडकलेली उष्णता या थंडीची भरपाई करेल. ती पृथ्वीला दुसऱ्या हिमयुगात प्रवेश करण्यापासून रोखेल. हिमयुग टाळणे ही चांगली बातमी वाटत असली तरी संशोधकांच्या इशाऱ्यानुसार जागतिक तापमानवाढ ही सोपी कामगिरी नाही. त्याचे पृथ्वीवर इतर गंभीर आणि अप्रिय परिणाम होऊ शकतात.

# छत्रपती राजर्षी शाहू अर्बन को-ऑप.बँक शाखा केज यांच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

## संस्थापक अध्यक्ष कै.अर्जुनराव जाहेर पाटील अप्पासाहेब यांच्या जयंती निमित्त उपक्रम

दैनिक वादळ वार्ता
**केज ज्ञ प्रतिनिधी**

छत्रपती राजर्षी शाहू अर्बन को-ऑप.बँक लि. बीड शाखा केज यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही उत्कृष्ट शैक्षणिक कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार दि.१२ आक्टोबर २०२५ रोजी रविवारी करण्यात आला.बंकेचे संस्थापक अध्यक्ष मा.इंजी. अर्जुनराव लक्ष्मणराव जाहेर पाटील यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या पारितोषिक वितरण कार्यक्रमासाठी गुणवंत विद्यार्थ्यांची यादी जाहीर करण्यात आली.बँकेच्या परंपरेनुसार दरवर्षी सभासदांच्या होतकरू, गुणवत्ता आधारित यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना सन्मानित करण्याचा उपक्रम राबवला जातो.यंदा केज शाखेतील एकूण १७ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

या विद्यार्थ्यांनी इयत्ता दहावी,बारावी,पदवी, पदव्युत्तर तसेच तांत्रिक शिक्षणामध्ये उत्कृष्ट गुण प्राप्त केले आहेत.त्यांना प्रमाणपत्रपारितोषिक तसेच सत्काराद्वारे गौरविण्यात आले.या वेळी बंकेचे स्थानिक सल्लागार हनुमंत भोसले, रामचंद्र आनेराव काका, अड.सुधाकर अंबाड,अड. वसंतराव चिंचोलीकर, अरुण अंजान,बापुराव शिंगण,हनुमंत मुळे, सुर्यकांत भोईटे आदि मान्यवर उपस्थित होते.

गुणवंत विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत चाळक अमर अरविंद, चाळक श्रेया वसंत, चाळक ज्ञानेश्वर वसंत, नेहरकर वर्षा विलास, देशमुख वैष्णवी,मोकाशी आदित्य अनंत,यादव स्नेहल बाळासाहेब, अंजान अभिजीत अरुणराव,जाधव संदेश गजेंद्र,मुळे तनुजा हनुमंत, सोमवंशी समर्थ हनुमंत, मुळे कृष्णा



पांडुरंग,जाधव शुभम सर्जेराव,तपसे राजेश सुरेश,भोईटे अपुर्वा सुर्यकांत,बनसोडे प्रत्युष पांडुरंग आदि विद्यार्थ्याचा सत्कार करण्यात आला. या उपक्रमाबद्दल बोलताना बँकेचे शाखा व्यवस्थापक सर्जेराव जाधव यांनी सांगितले की,आमच्या बँकेचा उद्देश केवळ आर्थिक व्यवहारा पुरता मर्यादित नाही,तर समाजातील होतकरू विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे हाही आमचा सामाजिक बांधिलकीचा भाग आहे. विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घेत समाजाच्या विकासात योगदान द्यावे,यासाठी आम्ही प्रेरणा देत आहोत.बंकेचे विद्यमान अध्यक्ष इंजि.अजयराव पाटील साहेब हा वसा पुढे राबवत आहेत असे त्यांनी सांगितले,यावेळी सर्व विद्यार्थ्यांना सन्मानपत्र व पारितोषिके प्रदान करण्यात आली.सुत्र संचालन व आभारप्रदर्शन हनुमंत भोसले यांनी केले.

## धनगर समाजाला अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात समाविष्ट करा मागणीसाठी रास्ता रोको अंदोलन

दैनिक वादळ वार्ता
**औसा । नदीम पटेल**

धनगर समाजाला अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात समाविष्ट करून आरक्षण द्यावे, या प्रमुख मागणीसाठी औसा शहरात सोमवारी, दिनांक १३ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता राष्ट्रीय महामार्गावरील 'टी पॉईंट' येथे भव्य रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात धनगर समाजाचे शेकडो बांधव सहभागी झाले होते, ज्यामुळे काही काळ राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक पूर्णतः ठप्प झाली होती.महाराष्ट्रातील विविध भागांत सुरू असलेल्या धनगर समाजाच्या आंदोलनाचा एक भाग म्हणून हे रास्ता रोको आंदोलन औशात करण्यात आले. आंदोलनादरम्यान समाजातील नेत्यांनी आपल्या भाषणातून शासनाला कडक इशारा दिला. धनगर समाजाला एसटी आरक्षण लवकरात लवकर न मिळाल्यास, भविष्यात संपूर्ण देशभरात यापेक्षाही तीव्र स्वरूपाचे आंदोलन उभारले



जाईल, असे नेत्यांनी ठणकावून सांगितले. 'धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण द्या' या मागणीसाठी औसा टी पॉईंटवर रास्ता रोको केल्यानंतर, आंदोलक शांततापूर्ण मार्गाने औसा तहसीलदार यांच्याकडे मागणीचे एक निवेदन सादर केले.

सध्या संपूर्ण महाराष्ट्रात धनगर समाजाकडून चक्काजाम आणि रास्ता रोको सारखी आंदोलने विविध ठिकाणी केली जात आहेत, ज्यामुळे आरक्षणाचा हा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. औसा येथील या आंदोलनाने शासनाचे लक्ष वेधून घेतले आहे.

## तळोदा नगरपरिषदेचा महत्त्वपूर्ण निर्णय: १८००० मालमत्तांची अचूक मोजणी;करप्रणालीत येणार पारदर्शकता

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

तळोदा नगरपरिषदेने शहरातील मालमत्ता करप्रणालीत सुयोग्य न्याय आणि पारदर्शकता आणण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. नगरपरिषदेमार्फत अमरावती येथील स्थापत्य कन्सल्टन्स या कंपनीच्या माध्यमातून शहरातील अंदाजे १७ ते १८ हजार मालमत्तांची अचूक मोजणी करण्याचे कार्य गेल्या तीन ते चार महिन्यांपासून सुरू आहे.

स्थापत्य कन्सल्टन्सीचे कर्मचारी प्रत्येक मालमत्ता धारकाच्या घरी जाऊन, घराची प्रत्यक्ष परिस्थिती आणि बांधणी विचारात घेऊन, योग्य ते मोजमाप काढत आहेत. हे मोजमाप नगरपालिकेला सादर केले जाणार आहे. यामुळे मालमत्ता धारकांना त्यांच्या मालमत्तेच्या अचूक आकारमानानुसार कर आकारला जाईल आणि करात कुठल्याही प्रकारचा कमी-जास्तपणा राहणार नाही, याची दक्षता नगरपरिषदेसह स्थापत्य




कन्सल्टन्सीच्या वतीने घेतली जात आहे. या मोजणी प्रक्रियेमुळे मालमत्ता धारकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. 'गरीब असो श्रीमंत किंवा इतर वर्गाचा, त्याची मालमत्ता जेवढी आहे, तेवढ्यावरच त्याला कर आकारला जाणार आहे,' असे कर्मचाऱ्यांनी सांगितले. कर्मचाऱ्यांच्या या भूमिकेमुळे मालमत्ता धारक देखील मोजणीला विरोध न करता पूर्ण सहकार्य करत आहेत. कर्मचारी आहे त्या पद्धतीनेच नोंद करत असल्याने मालमत्ता धारकांचा नगरपरिषदेच्या या पारदर्शक प्रयत्नाला पूर्ण पाठिंबा मिळत असल्याचे दिसून येत आहे.

आतापर्यंत साधारणता १४ हजार मालमत्तांची मोजदाद झाली असून उर्वरित मालमत्तांची मोजणी देखील दिवाळीपर्यंत पूर्ण होईल असे आलेल्या सर्वेक्षण कर्मचाऱ्यांचे वतीने सांगण्यात आले आहे.

## बीड शहरात काँग्रेस न.प.निवडणूक स्वबळावर लढणार-परवेज कुरेशी

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

आगामी होऊ घातलेल्या नगरपरिषदेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने बीड शहरात काँग्रेस स्वबळावर संपूर्ण जागा लढणार असल्याची



माहिती काँग्रेसचे शहराध्यक्ष परवेज कुरेशी यांनी दिली आहे. पक्षाच्या नेत्या सोनिया गांधी, मल्लिकार्जुन खरगे,राजीव गांधी, खा. रजनीताई पाटील,माजी मंत्री अशोकराव, पाटील आदित्य पाटील काँग्रेस जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या आदेशाने बीड नगरपालिकेची निवडणूक काँग्रेस स्वबळावर संपूर्ण जागा निवडणूक लढवणार असल्याची माहिती काँग्रेसचे शहराध्यक्ष परवेज कुरेशी यांनी एका पत्रकाद्वारे सांगितले आहे. ३५ वर्षे ज्यांनी नगरपालिका लुटली आहे विकासाच्या नावाखाली खूप मोठा भ्रष्टाचार केला आहे. त्यांना आता घरी बसण्याची वेळ आली आहे. विकासाच्या मुद्द्यावर व जनतेच्या हिताची कामे करण्यासाठी बीड शहर काँग्रेसने आता कंबर कसली आहे.बीड नगरपालिकेतील एक अधिकार शाही संपुष्टात आणण्यासाठी, घरणे शाहीला मूठ माती देण्यासाठी, काँग्रेस संपूर्ण ताकतीनिशी नगराध्यक्ष तसेच सर्व प्रभागातील निवडणुका ताकतीन लढणार असल्याची माहिती सांगण्यात आली आहे. लवकरच बीड शहरात पक्षश्रेष्ठीच्या नेतृत्वाखाली व्यापक बैठक घेणार असल्याची माहिती ही त्यांनी सांगितली. या महत्वपूर्ण बैठकीत सर्व पदाधिकाऱ्यांचे मनोगते ऐकून घेतल्यानंतर अनेक मोठे निर्णय घेतले जाणार असल्याची माहिती देखील त्यांनी सांगितली.

## तळोदा पंचायत समिती गण आरक्षण सोडत जाहीर!

# आमलाड,बोरद,प्रतापूर महिलांसाठी आरक्षित; छोटा धनपूर सर्वसाधारण

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तळोदा (जि. नंदुरबार) पंचायत समितीच्या गणांची आरक्षण सोडत दिनांक १३ रोजी जाहीर करण्यात आली आहे. या आरक्षण सोडतीनुसार, तळोदा पंचायत समितीच्या एकूण दहा गणांपैकी बहुतांश जागा अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी आरक्षित झाल्या असून, महिलांसाठी लक्षणीय आरक्षण ठेवण्यात आले आहे.

आरक्षण सोडतीचे स्वरूप जाहिर झालेल्या आरक्षणानुसार तळोदा पंचायत समितीच्या दहा गणांपैकी पाच जागा अनुसूचित जमातीच्या महिलांसाठीआरक्षित झाल्या आहेत, तर 'छोटा धनपूर' हा गण 'सर्वसाधारण' प्रवर्गासाठी खुला झाला आहे.

**गणांनुसार झालेले आरक्षण खालीलप्रमाणे**

१. आमलाड -: अनुसूचित जमाती महिला
२. छोटा धनपूर:- सर्वसाधारण
३. बोरद :- अनुसूचित जमाती महिला.
४. मोड:- अनुसूचित जमाती



५. प्रतापूर अनुसूचित जमाती महिला.
६. अलवान अनुसूचित जमाती
७. धवळी विहीर:- अनुसूचित जमाती.
८. इच्छागव्हाण:- अनुसूचित जमाती महिला.
९. बुधावल:- अनुसूचित जमाती
१०. नर्मदा नगर:-अनुसूचित जमाती महिला.

या आरक्षण सोडतीमुळे तळोदा तालुक्यातील राजकीय वातावरण तापू लागले आहे. विशेषतः आमलाड, बोरद, प्रतापूर, इच्छागव्हाण आणि नर्मदा नगर या महिलांसाठी आरक्षित झालेल्या जागांवर आता इच्छुक महिला उमेदवारांची लगबग वाढणार आहे. तर मोड, अलवान, धवळीविहीर या गणांमध्ये अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातून कोण बाजी मारणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

ज्या इच्छुकांनी यापूर्वी तयारी सुरू केली होती, त्यांना आता आपल्या गणाच्या आरक्षणाची निश्चिती झाल्याने पुढील राजकीय डावपेच आखणे सोपे होणार आहे. छोटा धनपूर हा एकमेव गण खुला असल्याने, येथे सर्वच प्रवर्गातील उमेदवारांकडून जोरदार तयारी केली जाईल.

यावेळी तहसीलदार दिपक धिवरे, निवासी नायब तहसीलदार निशा नाईक,ग्रा.नि.प्रा.स.स.प्र.सचिव मनोज देशमुख,महसूल सहाय्यक प्रदीप गावित,महसूल नायब तहसीलदार विजय ससे,सहाय्यक महसूल अधिकारी वासुदेव धनगर,पुरवठा निरीक्षक द्वारका आगळे, परिसरातील सरपंच उपसरपंच व सामान्य नागरिक आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते उपस्थित होते.

**नंदुरबार जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या तळोदा तालुक्यातील गटनिहाय आरक्षण**

धवळीविहीर :- अनुसूचित जमाती प्रतापपूर :- अनुसूचित जमाती महिला
बोरद :- अनुसूचित जमाती महिला
आमलाड :- अनुसूचित जमाती
नर्मदाननगर :- अनुसूचित जमाती

## हक्क व अधिकारांविषयी मुलींनी जागृत राहावे-न्यायाधीश दिनेश माने

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी मुलींना शिक्षणाचा हक्क मिळवून दिला. त्यामुळे आजच्या शिक्षित मुलींनी आपल्या हक्क व अधिकारांबद्दल जागृत राहणे महत्त्वाचे आहे. अन्यायग्रस्त व्यक्तींना न्याय देण्यासाठी बनवलेल्या कायद्यांचा वापर करणे गरजेचे असून, त्यासाठी तालुका विधी सेवा समिती मुलींच्या मदतीसाठी नेहमीच तत्पर राहील, असे प्रतिपादन तळोदा न्यायालयाचे दिवाणी न्यायाधीश दिनेश माने यांनी केले.

तळोदा येथील गुलाबबाई दुल्लभ राजकुळे कन्या विद्यालयात तालुका विधी सेवा समिती आणि तालुका वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थीनींसाठी कायदेविषयक साक्षरता शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तळोदा दिवाणी न्यायाधीश दिनेश माने होते.



यावेळी वकील संघाचे सचिव चंद्रकांत आगळे, सरकारी वकील राहुल मगरे, शिक्षण विस्तार अधिकारी वसंत जाधव, अक्षता मुके, दुर्वेश मराठे, पत्रकार नितीन गरुड, उल्हास मगरे, जेष्ठ शिक्षक योगेश पाटील, दिलीप तडवी आदी मान्यवर उपस्थित होते.उपशिक्षिका वैशाली देवरे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी न्यायालय लिपिक दीपक चौधरी, उपशिक्षक दिनेश मराठे, भाग्यश्री सागर, हरिश्चंद्र कोळी, ज्योती महाजन आणि शिपाई अनिल मगरे यांनी परिश्रम घेतले

## सामाजिक बांधिलकी जोपसणारे शिक्षक म्हणजे डॉ. सुमंत गायकवाड-विजय साळवे

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । दर्शन डोंगरे**

येथील महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी प्रिय शिक्षक डॉ. सुमंत गायकवाड हे सामाजिक बांधिलकी जोपसणारे शिक्षक आहेत असे प्रतिपादन रिपब्लिकन सेनेचे बीड जिल्हाध्यक्ष विजय दादा साळवे यांनी केले नेपाळ येथील गांधी फाउंडेशनची मानद डॉक्टरेट पदवी डॉ. सुमंत गायकवाड यांना मिळाल्याबद्दल १२ आक्टोबर २०२५ रोजी श्रीमिती आर जी. वैराळे येथे मित्र परिवाराच्यावतीने आयोजित सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी ज्येष्ठ नेते दयानंद भाऊ स्वामी, सेवानिवृत्त केंद्र प्रमुख उत्तम जोगदंड, गुरुवर्य ए. के. भोसले ॲड. सुभाष नाडे यांची प्रमुख उपस्थिती होती .

पुढे बोलताना विजय दादा म्हणाले की माजलगाव येथेभारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक व्हावे यासाठी त्यांनी



स्मारक समितीत सहसचिव म्हणून केलेले काम हे नोंद घेण्यासारखे आहे याप्रसंगी दयानंद भाऊ स्वामी, उत्तमराव जोगदंड, ए. के. भोसले व ॲड. सुभाष नाडे यांनी डॉ. सुमंत गायकवाड यांच्या विषयी बोलताना त्यांच्या विषयी गौरवोदगार काढले याप्रसंगी सेवानिवृत्त मुख्याध्यापिका अनिता जोगदंड, आदर्श शिक्षिका संजवनी मेहत्रे आगजाळ व एमपीएस्सी परीक्षा उत्तीर्ण करत राज्य उत्पादन शुल्क विभाग लातूर येथे नियुक्ती मिळवलेल्या कु. पुष्पावती राजाभाऊ पवार यांचाही सत्कार करण्यात आला याप्रसंगी माजी सरपंच एकनाथ मस्के कृषीउत्पन्न बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सवणे, शेख मसूद, रमेश कुटे, रामकिसन कोरडे उपप्राचार्य कदम सर, ॲड. दत्ता जाधव, संदिप भराडे पी. एम. जावळे, किसन मिसाळ मुरली गवळी,चत्रभुज शेरकर, प्रा. चांदणेसर,शाहीर युराज ढगे, आगजळ सर, नारायण मेंढके, नवनाथ मेंढके, रत्नेश्वर मेंढके यांनी ही डॉ. सुमंत गायकवाड व पत्नी उषा गायकवाड यांचा सत्कार केला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मित्रपरिवाराच्या वतीने ॲड दत्ता जाधव यांनी केले कार्यक्रमाला बहुसंख्य नागरिक व महिला यांची उपस्थित होती

# विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या मागणीला यश

## आजी-माजी शिक्षक आमदारासह; ८ व ९ जुलै रोजीच्या शाळा बंद आंदोलनाचे हे यश-खंडेराव जगदाळे

### अंशत:अनुदानित शिक्षकांच्या वाढीव टप्पा अनुदान वितरणाचा शासन निर्णय पारित!

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

राज्यातील अंशतः अनुदानित शिक्षकांच्या वाढीव टप्प्यानुसार वेतनाच्या ऑक्टोबर महिन्याच्या तरतुदीचा अनुदान वितरण आदेश पारित करावा अशी मागणी राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने करण्यात आली होती या मागणीला यश आले आहे.
आज सोमवार दिनांक १३ ऑक्टोबर रोजी
अंशत: अनुदानित शिक्षकांच्या वाढीव टप्पा अनुदान ऑक्टोबर महिन्याच्या वेतनासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. सदर निधी वितरणाचा शासन आदेशही आज जारी करण्यात आला आहे. राज्यातील सर्व आजी माजी शिक्षक आमदार आणि विविध शिक्षक संघटना यांच्यासह ८ व ९ जुलै २०२५ रोजीच्या राज्यव्यापी शाळा बंद आंदोलनाचे हे यश असल्याचे विनाअनुदानित शाळा कृती समितीचे राज्य उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे यांनी सांगितले. सदर शासन आदेश निर्गमित झाल्याने सध्या अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे आणि समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.
राज्यातील विनाअनुदानित शाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या खात्यावर वाढीव २० टक्के अनुदाना वितरित करण्यासाठी २५ ऑगस्ट २०२५ रोजी शासन निर्णय झाला. परंतु ऑगस्ट सप्टेंबर आणि आता ऑक्टोबर महिना सुरू झाला तरी देखील वाढीव टप्प्याप्रमाणे अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या खात्यावर वाढीव टप्प्याचे वेतन झाले नाहीत. २० टक्के वाढीव टप्प्याप्रमाणे निधीची तरतूद व्हावी यासाठी अनेक दिवसापासून आजी व माजी शिक्षक आमदार यांच्यासह शिक्षक संघटना प्रयत्न करीत होत्या. परंतु शासनस्तरावर कोणतीच हालचाल होत नसल्याने शेवटी विनाअनुदानित शाळा कृती समितीने वाढीव टप्पा नुसार निधीची तरतूद करून २० ऑक्टोबर २०२५ पूर्वी वेतन शिक्षकांच्या खात्यात जमा व्हावे न झाल्यास २१ ऑक्टोबर रोजी दिवाळी दिवशीच राज्यातील सर्व शिक्षण उपसंचालक आणि सर्व जिल्ह्यातील शिक्षणाधिकारी यांच्या दारात काळी दिवाळी साजरी करण्याचा इशारा देत आंदोलनाचे हत्यार उपसले. विना अनुदानित शाळा कृती समितीच्या या इशारा आंदोलनाची शासन आणि प्रशासनाने गांभीर्याने दाखल घेतप्रत्यक्षात टप्पा वाढ निधी वितरणाच्या कामाला सुरुवात केली. सोमवार दि.१३ ऑक्टोबर २०२५ रोजी अंशत: अनुदानित शिक्षकांच्या वाढीव टप्पा अनुदानाप्रमाणे ऑक्टोबर महिन्याच्या वेतनासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. सदर निधी वितरणाचा शासन आदेश आज सोमवार रोजी शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. येत्या दोन-चार दिवसात दिवाळीच्या सणाच्या निमित्ताने ऑक्टोबर पेड इन ऑक्टोबर असे वाढीव टप्पा अनुदाना प्रमाणे होणारे वेतन शिक्षकांच्या खात्यात जमा होणार आहे. या कामी आ. ज्ञानेश्वर म्हात्रे व माजी आमदार श्रीकांत देशपांडे यांच्यासह राज्यातील इतर आजी माजी शिक्षक आमदार आणि विविध शिक्षक संघटनांचे प्रयत्न कामी आले असल्याचे राज्य उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे यांनी सांगितले. सध्या अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे आणि समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## भाऊसाहेब पाटील अध्यापक महाविद्यालय, केजला प्रशासकीय तपासणीत C+ ग्रेड प्राप्त

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**



भाऊसाहेब पाटील अध्यापक महाविद्यालय, केज येथे अलीकडेच प्रशासकीय अंकेक्षण समितीमार्फत तपासणी पार पडली.या तपासणीत महाविद्यालयास C+ ग्रेड प्राप्त झाला असून, संस्थेच्या प्रगतीच्या दिशेने हा एक महत्वाचा टप्पा मानला जात आहे.या यशाबद्दल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (बीड) जिल्हा उपाध्यक्ष श्री.प्रविणकुमार शेप तसेच संस्थेचे प्रशासकीय अधिकारी श्री.प्रताप मोरे सर यांच्या उपस्थितीत प्राचार्य डॉ. हनुमंत सौदागर व सुजीत नाईकवाडे यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी त्यांना पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले.महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण शैक्षणिक कार्य,पारदर्शक प्रशासन आणि शिस्तबद्ध कार्य पद्धतीमुळे हे यश मिळाल्याचे प्रशासकीय अधिकारी श्री.प्रतापराव मोरे सर यांनी सांगितले. भविष्यात महाविद्यालयाला अधिक उच्च श्रेणी मिळवण्या साठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहन ही करण्यात आले.या कार्यक्रमाला प्राध्यापक वर्ग,कर्मचारी,विद्यार्थी तसेच स्थानिक मान्यवर उपस्थित होते.संस्थेच्या या यशामुळे केज तालुक्यात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

## केजचा सुपुत्र संकेत लांडगे याचे राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत चमकदार यश

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,नाशिक यांच्या वतीने आयोजित क्रीडा महोत्सव २०२५ मधील राज्यस्तरीय आंतर विभागीय थलेटिक्स व खो-खो स्पर्धेत मराठवाड्याच्या वतीने केजचा सुपुत्र संकेत महादेव लांडगे याने चमकदार कामगिरी केली आहे.केजचा सुपुत्र व धनवेश्वरी आयुर्वेदिक कॉलेज,संभाजीनगरचा विद्यार्थी संकेत महादेव लांडगे याने २०० मीटर आणि १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत महाराष्ट्रातून द्वितीय क्रमांक पटकावून रौप्यपदक सिल्वर मेडल मिळवले.ही स्पर्धा राज्या तील विविध विभागांच्या प्रतिनिधींमध्ये अतिशय उत्साहात पार पडली.त्याचबरोबर राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेत त्याच्या संघाने अव्वल कामगिरी करत महाराष्ट्रात प्रथम क्रमांक मिळवून सुवर्णपदकगोल्ड मेडल पटकाविले.संकेतच्या या दुहेरी यशामुळे केज तालुका आणि संपूर्ण मराठवाड्याचा गौरव झाला आहे.संकेतच्या या यशाबद्दल संस्थेचे प्राचार्य, प्राध्यापक वर्ग,मित्र परिवार तसेच केज येथील ग्रामस्थांनी त्याचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.तसेच पुढील वाटचालीसाठी त्यांच्या वर शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला आहे.या यशामागे संकेतचा सातत्यपूर्ण सराव, शिस्तबद्ध मेहनत आणि क्रीडाप्रेम स्पष्टपणे दिसून येत आहे.त्याच्या या यशा मुळे मराठवाड्यातील इतर विद्यार्थ्यांनाही क्रीडा क्षेत्रात प्रेरणा मिळणार आहे.



## पंचायत समिती धडगाव आरक्षण सोडत जाहीर

दैनिक वादळ वार्ता
**रविंद्र वळवी मोलगी । प्रतिनिधी**

धडगाव तालुक्यातील पंचायत समितीच्या गणांची आरक्षण सोडत आज जाहीर करण्यात आली. धडगाव तालुक्यातील पंचायत समितीच्या गणांची आरक्षण सोडत आज जाहीर करण्यात आली. एकूण १४ गणांपैकी ७ गण अनुसूचित जमाती (महिला) या प्रवर्गासाठी तर उर्वरित ७ गण अनुसूचित जमाती (सर्वसाधारण) प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आले आहेत.या सोडतीनुसार घाटली, गोरांबा, असली, मांडवी बु., बिजरी, सावऱ्यादिगर आणि मुंदलवड हे गण अनुसूचित जमाती (महिला) प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आले आहेत. तर त्रिशूल, तेलखेडी, तोरणमाळ, कात्री , सिसा, बिलगाव आणि धनाजे बु. हे गण अनुसूचित जमाती (सर्वसाधारण) प्रवर्गासाठी राखीव करण्यात आले आहेत.
या सोडतीनंतर पंचायत समिती धडगावच्या निवडणुकीसाठी उमेदवारांच्या तयारीला वेग येणार




असून स्थानिक राजकीय वातावरण अधिक रंगतदार होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.
या सोडतीनुसार पंचायत समिती धडगावच्या निवडणुकीतील उमेदवारांची तयारी आता सुरू होणार आहे. स्थानिक राजकीय वातावरणही यामुळे चांगलेच तापण्याची शक्यता आहे

## शहरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पथसंचलन व विजया दशमी उत्सव उत्साहात साजरा

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

दि.१२ ऑक्टोंबर २०२५ रविवार रोजी केज शहरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सघोष,विजया दशमी उत्सवा निमित्त सवाद्य पथसंचलन उत्साहात संपन्न झाले. यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शताब्दी वर्ष असल्याने स्वयंसेवकात अधिक उत्साह होता.
स्वामी विवेकानंद शाळा धारूर रोड ते मंगळवार पेठ रोड,आंबेडकर चौक, साठे चौक,भगवान बाबा चौक,छत्रपती शिवाजी महाराज चौक ते हनुमान मंदिर कानडी रोड,वकील वाडी सह पूर्ण शहरांमध्ये पथसंचलन करण्यात आले. शहर, तालुक्यातील संघाच्या स्वयंसेवकांनी मोठ्या उत्साहाने सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास शिस्तबद्ध रीतीने



ढोल,घोष,झांजाच्या तालावर,गणवेशात लाठ्या काठ्या हातात घेऊन स्वयंसेवकानी पथसंचलन करीत नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.केज शहरातून मिरवणूक चालू असताना नागरिकांनी व महिलांनी स्वयंसेवकावर फुलांची उधळण केली,जागोजागी रस्त्यावर रांगोळी काढण्यात आली होती. पथसंचलन पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती,प्रथम संघाचा ध्वज शाखेतफडकवण्यात आला,व प्रार्थना घेण्यात आली,समारोप वकील वाडी हनुमान मंदिर येथे
संघाचे सर संघचालक डॉ. केशव बळीराम हेडगेवार, छत्रपती शिवाजी महाराज व गोळवलकर गुरुजी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. अनेक उपस्थित मान्यवरांनी संघाचे विचार मांडले.राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा इतिहास,स्थापना, संघाच्या कामाचे महत्त्व, पटवून दिले.कार्यक्रमाचा शेवट झाल्यानंतर सर्वांना अल्पोपहार वाटप करण्यात आला.तसेच पथ संचलनात सहभागी स्वयंसेवकांसाठी भोजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. शहरातील व तालुक्यातील प्रतिष्ठित नागरिक,महिला,पुरुष, लहान मुले,मोठ्या संख्येने पथ संचलनात सहभागी झाले होते.

## नगरपालिका मतदार यादीत प्रचंड गोंधळ?

### सत्ताधाऱ्यांच्या दबावाखाली निवडणूक प्रशासन कटपुतळीप्रमाणे काम करीत आहे-बहादूर भाई

दैनिक वादळ वार्ता
**परळी । प्रतिनिधी**

आगामी परळी नगर परिषदेच्या निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेल्या मतदार यादी मध्ये प्रचंड गोंधळ असून राष्ट्रीय काँग्रेस पक्षाने याविषयी निवडणूक आयोगाकडे आमचा आक्षेप नोंदविला होता.परंतू सत्ताधाऱ्यांच्या दबावापुढे निवडणूक प्रशासन एखाद्या कटपुतळीप्रमाणे काम करीत असल्याचेही काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादुरभाई यांनी आज दिनांक १३ रोजी आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले.

पत्रकार परिषदेत पुढे बोलताना काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादूर भाई यांनी नगरपालिका निवडणूक प्रशासनाने कशा प्रकारे चुकीची प्रभाग रचना केली आहे हे नकाशानुसार दाखविले. एका वार्डातील मतदार दुसऱ्या वार्डात तर दुसऱ्या वर्गातील मतदार जुन्या वार्डात टाकून प्रभाग रचना बनविण्यात आली आहे. यातून सत्ताधारी नेत्यांचा पॉकेट मतदार वाढवण्याचा प्रयत्न दिसून येत आहे. यामध्ये नैसर्गिक नियमांचा वापर न करता सत्ताधाऱ्यांना अपेक्षित अशी मनमानी प्रभाग रचना बनविण्यात आली आहे. ज्यात मतदारांच्या संख्येतही प्रचंड प्रमाणात तफावत दिसून येते आहे.हे उदाहराणासह पटवून देतांना १६०० मतदारांसाठी २ नगरसेवक,५००० मतदारांसाठी ३ तर ९००० हजार मतदार असलेल्या प्रभागात २ नगरसेवक अशी चुकीची रचना जाणीवपूर्वक केल्याचे दाखवून दिले.

परळीतील प्रभाग रचनेवर काँग्रेसने आक्षेप घेतला होता. परंतु बीड जिल्हाधिकाऱ्यांनी याप्रकरणीआमचा आक्षेप यावर सुनावणी झाली पण त्याचा निकाल दिला नाही.तरीही परळी नगर



परिषदेच्या प्रभाग रचना, प्रभागांचे आरक्षण जाहीर करण्यात आले.सत्ताधारी पक्षाच्या दबावाखाली रचना, आरक्षण व मतदार याद्या बनविण्यात आल्याचा आरोप काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादुर भाई यांनी पत्रकार परिषदेत केला. दरम्यान आमचा आक्षेप निवडणूक प्रशासनाने ऐकून घेतला नसल्यामुळे आम्ही लवकरच संभाजीनगर हायकोर्टात याचिका दाखल करणार आहोत आणि वेळप्रसंगी रस्त्यावर उतरून आंदोलने उभे करू असे बहादूर भाई यांनी सांगितले. दरम्यान परळी नगर परिषदेचे प्रभाग रचना नव्याने तयार करून निवडणुका घ्याव्यात अशी मागणी ही या पत्रकार परिषदेद्वारे बहादुर भाई यांनी केली आहे. या पत्रकार परिषदेस काँग्रेसचे परळी शहर अध्यक्ष सय्यद हनीफ सय्यद करीम उर्फ( बहादूरभाई) कार्यकारी अध्यक्ष शशी शेखर चौधरी, उपाध्यक्ष सुभाषसर देशमुख, वैजनाथराव गडेकर,इतशाम खतिब, अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष रसूल खान, शहराध्यक्ष सद्दाम भाई गुत्तेदार,अनुसूचित शहराध्यक्ष दीपक राव शिरसाठ, प्रवक्ते बदरभाई, युवा नेते बाबा भाई, इत्यादी काँग्रेसकडून उपस्थित होते.

## संगम जिल्हा परिषद प्रा.शाळेत मुख्याध्यापक अशोक नांवदे सर यांचा निरोप समारंभ कार्यक्रम



दैनिक वादळ वार्ता
**परळी । प्रतिनिधी**

संगम येथील शाळेचे मुख्याध्यापक श्री अशोक नांवदे सर,महादे गित्ते सर,व सुभाष कोंकेवाड सर या तिन शिक्षकांच्या बदल्या संगम शाळेतुन झाल्या बद्दल आज संगम येथे निरोप संमारंभ कार्यक्रम करण्यात आला एक भावपूर्ण निरोप समारंभ कार्यक्रम आयोजित करण्यात आला, ज्यामध्ये आदरणीय तिनीही सरांना सन्मानपूर्वक निरोप देण्यात आला. हा कार्यक्रम शाळेच्या शालेय शिक्षण समिती अध्यक्ष तथा अखिल भारतीय वारकरी भजनी मंडळाचे अध्यक्ष रामेश्वर महाराज कोकाटे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सरपंच अच्युत चव्हाण यांची उपस्थितीत व ज्यात शाळेतील विद्यार्थी, शिक्षकवृंद आणि मान्यवर उपस्थित होते

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077